दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.१२ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २२६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 12 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 226 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# जनसुरक्षा विधेयक जनतेच्या नाही, तर भाजपच्या सुरक्षेसाठी:उद्धव ठाकरेंचा टोला

**मुंबई (वृत्तसंस्था)**–उद्धव ठाकरे यांनी जनसुरक्षा विधेयकाला विरोध दर्शवला आहे. या कायद्यामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप केला आहे. हे विधेयक जनतेच्या नव्हे, तर भाजपच्या सुरक्षेसाठी आहे. त्यामुळे या विधेयकाचे नाव 'जनसुरक्षा विधेयक'ऐवजी 'भाजप सुरक्षा विधेयक' ठेवा असा टोला, उद्धव ठाकरे यांनी भाजपला लगावला. जनसुरक्षा विधेयकात काही बदल करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे.जनसुरक्षा विधेयक गुरुवारी विधानसभेत आवाजी मतदानाने बहुमताने मंजूर झाले. आज या विधेयकवार विधान परिषदेत चर्चा झाली. या चर्चेवेळी विरोधकांनी जनसुरक्षा विधेयकाला विरोध केला आहे. या विधेयकाला असहमती देणारे पत्र महाविकास आघाडीने सभापती यांना सादर केले आहे. तर उद्धव ठाकरे यांनी विधान भवन परिसरात पत्रकारांशी बोलताना जनसुरक्षा विधेयकाला आमचा विरोध असल्याचे मत व्यक्त केले.

जनसुरक्षा विधेयकाला आमचा विरोध आहे. राजकीय हेतून विधेयक आणू नका, असे ठाकरे म्हणाले. या विधेयकामध्ये राजकीय दुरुपयोगाचा वास येत आहे. सत्ताधाऱ्यांच्या कथनी आणि करणीमध्ये फरक दिसत आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. या विधेयकात नक्षलवाद असा कुठेही उल्लेख नाही. नक्षलवाद संपत आलाय, मग कायदा कोणासाठी? असा सवालही उद्धव ठाकरेंनी केला.उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, बेकायदा कृत्य याची स्पष्ट व्याख्या विधेयकामध्ये नाही. विरोधकांना त्रास देण्यासाठी कायदा आणत आहात का? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला. या विधेयकाचे नाव जनसुरक्षा विधेयक असे असले, तरी हे विधेयक भाजपच्या सुरक्षेसाठी आणले आहे. त्यामुळे जनसुरक्षाऐवजी भाजप सुरक्षा विधेयक असे नाव करा, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. शेंडा बुडका नसलेले आणि मिसला टाडा या प्रमाणेच हे विधेयक असल्याचेही ते म्हणाले. या विधेयकात 'नक्षलवाद' असा कुठेही उल्लेख नाही, तुम्ही नक्षलवादाचा उल्लेख या विधेयकात करा आम्ही पाठिंबा देतो' असेही ठाकरे यांनी म्हटले आहे.या कायद्यानुसार जर एखादी व्यक्ती सरकारच्या मते सार्वजनिक सुव्यवस्थेला किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका ठरत असेल तर कोणत्याही आरोपांची नोंद करत त्या व्यक्तीला तात्काळ ताब्यात घेण्यात येतं. जनसुरक्षा कायदा हा दखलपात्र नसलेला कायदा आहे. हे विधेयक किंवा त्याद्वारे भविष्यात निर्माण होणाऱ्या कायद्यामुळे नक्षली चळवळींना मोठा हादरा बसणार आहे. या कायद्यांतर्गत अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संघटना व्यक्ती तसेच नक्षलवादी आणि माओवादी संघटनांवर कारवाई केली जाणार आहे.



# केज तालुक्यातील सरपंच पदाची १५ जुलै आरक्षण सोडत

## ग्रामस्थांनी उपस्थित राहावे–तहसीलदार राकेश गिड्डे

**केज । गौतम बचुटे**

केज तालुक्यातील ११४ ग्रामपंचायतीच्या सन २०२५ - २०३० या कालावधीसाठी सरपंच पदाची आरक्षण सोडत १५ जुलै रोजी सकाळी ११:०० वा. तहसील कार्यालयात होणार आहे. अशी माहिती तहसीलदार राकेश गिड्डे यांनी दिली. बीडचे जिल्हाधिकारी यांचे पत्र जा.क्रं २०२५/ जिबी/डेस्क-२/२०२५-२०३० ग्रा.पं. सरपंच आरक्षण/कावि- १६९२ दि. ८/७/२०२५ रोजीच्या पत्रा नुसार केज तालुक्यातील कार्यरत असलेल्या ११४ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या सन २०२५ - २०३० या कार्यकाळासाठी आरक्षण सोडत १५ जुलै रोजी सकाळी ११:०० वा. तहसील कार्यालयात ठेवण्यात आली आहे.

तरी प्रत्येक गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रा. पं. सदस्य व ग्रामस्थांनी सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीस १५ जुलै रोजी सकाळी ११:०० वा. तहसील कार्यालयात हजर राहावे. असे आवाहन तहसीलदार राकेश गिड्डे यांनी केले आहे. दरम्यान, संबंधित गावाच्या ग्राम महसूल अधिकारी व ग्रामविकास अधिकाऱ्यांना संबंधित अधिसूचनेची प्रत संबंधीत ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर डकविण्यात यावी. अशा सूचना या नोटिसद्वारे दिल्या आहेत. अशी माहिती तहसीलदार राकेश गिड्डे यांनी प्रसार माध्यमांच्या माध्यमातून दिली आहे.

# शिक्षकांचे निवृत्ती विषयक लाभ देण्यास प्रशासनाकडून दिरंगाई–अनिल जाधवर

**बीड (प्रतिनिधी):** महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या मोठी आहे .शासन निर्णयानुसार शिक्षक अथवा कर्मचारी सेवानिवृत्त होताना त्यांना मिळणारे अंशराशीकरण व उपदान हे आर्थिक लाभ अतिशय महत्त्वाचे असतात आणि कर्मचाऱ्यांच्या हक्काचे असतात. परंतु अलीकडील काळामध्ये शासनाच्या उदासीन धोरणामध्ये तसेच संचालन कार्यालयाच्या शिक्षक विरोधी धोरणामुळे सेवानिवृत्तांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ देण्यास दिरंगाई होत आहे . बीड जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे एप्रिल २०२४ पासूनचे अंशराशीकरण व उपदान या रकमा प्रलंबित आहेत. म्हणजे किमान एका वर्षापासून या रकमा प्रलंबित



आहेत . करिता कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाचे राज्य अध्यक्ष अनिल जाधवर यांनी संघटनेच्या शिष्टमंडळासह शिक्षण संचालक प्राथमिक माननीय शरद गोसावी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले व चर्चा केली . सदरील चर्चेनुसार महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदा कडून थकीत अंशराशीकरण व उपदान यांचा आढावा घेऊन या बाबीसाठी वित्त तरतूद करण्यात येणार आहे . तसेच सदरील थकीत असणारी देयके दोन-तीन महिन्याच्या आत पूर्णपणे टप्या - टप्या ने दिली जातील असे संचालक व संबंधित विभागाचे प्रशासन अधिकारी यांच्याकडून शिष्टमंडळास सांगितले गेले . परंतू एकटप्यात तात्काळ थकित रक्कम देण्याची संघटनेने प्रशासनाकडे मागणी केली . संघटनेच्या मागणीनुसार जुलै अखेरपर्यंत प्रलंबित असणारे सेवानिवृत्तांचे अंशराशीकरण व उपदान यासाठी वित्त तरतूद केली नाही तर १५ ऑगस्ट २०२५ रोजी संघटनेच्या वतीने शिक्षण संचालक कार्यालय पुणे येथे आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिलेला आहे . निवेदनाच्या प्रती माननीय अजितदादा पवार साहेब उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री, मा. शिक्षण सचिव , मा . शिक्षण आयुक्त पुणे यांना दिलेल्या आहेत .सदरील शिष्टमंडळामध्ये राज्य अध्यक्ष: अनिल जाधवर, महासचिव :सुभाष जगताप, उपाध्यक्ष: अभिजीत तांदळे, भगीरथ मस्के हे उपस्थित होते .

# धानोरा खु.येथे महिलांची सोयाबीन व ऊस शेतीशाळा संपन्न

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**–धानोरा खु. येथे महिलांची सोयाबीन व ऊस शेतीशाळा संपन्न झाली. कृषी विभाग व नॅचरल शुगरच्या वतीने हा संयुक्त उपक्रम आयोजित करण्यात आला होता.सुधारित कृषी तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी शेतीशाळा हे प्रभावी माध्यम असल्याने तसेच शेती व्यवसायामध्ये महिलांचा मोलाचा वाटा असल्याने कृषी विभागाने महिलांच्या शेतीशाळा घेण्यावर विशेष भर दिलेला आहे. कृषी विषयक नवीन तंत्रज्ञानाची माहिती महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि नॅचरल शुगर रांजणी यांच्या संयुक्त विद्यमाने कृषिरत्न बी. बी ठोंबरे, उपविभागीय कृषी अधिकारी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी पंडित काकडे व ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी धानोरा खुर्द येथे महिलांची शेतीशाळा घेऊन मार्गदर्शन केले.

कृषी अधिकारी पंडीत काकडे यांनी सोयाबीन पिकामधील रसशोषक कीड पांढरी माशी, खोडमाशी प्रादुर्भावाची निरीक्षणे दाखवून व्यवस्थापनासाठी चिकट सापळे यांचा वापर बाबत विस्तृतपणे माहिती दिली तसेच सरी वरंब्यावर टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड केल्यामुळे बियाण्याची झालेली बचत बाबत चर्चा केली. सिडिओ शिवप्रसाद येळकर यांनी कमी खर्चातील चिकटसापळे तयार करणे, अळीवर्गीय किडींचा जीवनक्रम सांगून व्यवस्थापनासाठी कामगंध सापळ्यांचे महत्त्व विस्तृतपणे माहिती देऊन कामगंध सापळे लावण्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण करून दाखवले. चुनखडी युक्त शेत




जमिनीमधील ऊस पिकामधील पिवळसरपणा विकृती व्यवस्थापन महाराष्ट्र ग्रेड २ मल्टीमायक्रोन्यूट्रिएंटची ३ मिली प्रति १ लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करणे, ऊस पिकामधील पोक्का बाईंग रोग व्यवस्थापनासाठी प्रोपिकोनाझोल २५ टक्के ईसी १ मिली प्रति १ लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी, जमिनीमधील घातक बुरशींच्या व्यवस्थापनासाठी नॅचरल शुगर उत्पादित फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर (एफओएम) मध्ये ट्रायकोडर्मा मिसळून वापर बाबत विस्तृतपणे माहिती दिली तसेच नॅचरल शुगरच्या माध्यमातून ड्रोनच्या साह्याने अनुदानित फवारणी, नॅचरल ऑरगॅनिक फर्टीलायझर उपलब्धता बाबत माहिती दिली. ग्राम महसूल अधिकारी सुहास चाटे यांनी ग्रीस्टॅक व ई पिक पाहणी करणे बाबत मार्गदर्शन केले. यावेळी तालुका कृषी अधिकारी मुंडे, मंडळ कृषी अधिकारी विजयकुमार पवार, उप कृषी अधिकारी माचवे, सरपंच पार्वती पोळ, बेस्ट ॲग्रोचे प्रतिनिधी उबाळे, तुकाराम रेड्डी आणि महिला व पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिजिटल मिडिया परिषदेचा सप्टेंबर मध्ये संभाजीनगरात राज्यव्यापी मेळावा

**मुंबई । प्रतिनिधी**

डिजिटल मिडियात कार्यरत असलेल्या पत्रकारांचा पहिला राज्यव्यापी मेळावा १४ सप्टेंबर २०२५ रोजी संभाजीनगर येथे होत असल्याची माहिती मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर आणि डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी दिली..मेळाव्याचे उद्घाटन राज्यातील पत्रकारांचे नेते एस.एम.देशमुख यांच्या हस्ते होणार आहे..

अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचा एक उपक्रम असलेल्या डिजिटल मिडिया परिषदेचा विस्तार राज्यभर झपाट्याने होत आहे.. राज्यातील ३० जिल्ह्यात डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या आहेत.. सर्वांना एका धाग्यात बांधण्यासाठी एक राज्यव्यापी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.. या मेळाव्यात राज्य कार्यकारिणीची घोषणा होणार असून उत्कृष्ट युट्यूब चॅनल आणि पोर्टल चालविणारया दहा संपादकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.. दोन सत्रात होणारया या मेळाव्यात व्यावसायिक पध्दतीने चँनल कसे चालवावे, त्यातून महसूल कसा उभा करावा, या संबंधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.. मेळाव्याचे स्थळ आणि अन्य माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. राज्यातील युट्यूब, पोर्टलच्या संपादकांनी मेळाव्यास मोठ्या संख्येनं उपस्थित राहावे असे आवाहनही मिलिंद अष्टीवकर आणि अनिल वाघमारे यांनी केले आहे.




# युवक नेते भारत ताटे यांनी वाढदिवसा निमित्ताने समाज हिताचे उपक्रम राबवून आदर्श निर्माण केला–बाजीराव धर्माधिकारी

**परळी । प्रतिनिधी**

आ.धनंजय मुंडे यांचे कट्टर समर्थक व राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते भारत ताटे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून समाजासाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून त्यांनी ग्रंथ वाटप, वृक्षारोपण आणि छत्री वाटपासारख्या उपक्रमांद्वारे समाजहिताचे कार्य हाती घेतले.भारत ताटे यांचा हा उपक्रम इतर नेत्यांनी व युवकांनी अनुकरण करावा, ही काळाची गरज आहे, असे गौरवोद्गार परळीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांनी काढले.

सकाळच्या सत्रात सुगंध कुटी बुद्ध विहार येथे महात्मा गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा



शुभारंभ झाला.वृक्षारोपणाचा उपक्रम साठे नगर व भीमनगर परिसरात पार पडला. या कार्यक्रमात सोपान ताटे, उत्तम समुद्रे, सुनील सोनवणे, राहुल ताटे, अमोल रोडे, बापू ताटे, अभिजीत ताटे, पंकज ताटे, बालाजी मस्के, मुन्ना मस्के, बाबासाहेब जगताप, अमित सावंत आदी मान्यवर सहभागी झाले होते.

त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सुरू असलेल्या वाचनालयाला महामानवांच्या विचारांचे ग्रंथ भेट देण्यात आले.

सायंकाळी छत्री वाटप व अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, प्रा. विनोद जगतकर, सुरेश नानवटे, सोपान ताटे, पंडित झिंझुर्डे, कांताराम समिन्दरसवळे, माधवराव ताटे, नितीन चव्हाण, भानुदास जंगले, सुनील कांबळे, राहुल घोबाळे, बबन मस्के, विक्रम मस्के, उपस्थित होते तर सूत्रसंचालन आनंद तूप समुद्रे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारत ताटे मित्र मंडळ भीमनगर व, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील जेष्ठ नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येनेउपस्थितहोते.

संपादकीय

# झाडे लावा, झाडे वाचवा



मनुष्याला आपले जीवन जगण्यासाठी मूलभूत गरजा दिल्या आहेत. त्यामुळे जे काय मनुष्याचे अस्तित्व आहे ते झाडांमुळेच. तेव्हा मनुष्याला ज्या प्रमुख जीवनावश्यक वस्तू मिळतात त्या झाडांमुळे. त्यामुळे झाडे लावा, झाडे जगवा असे म्हणत असतो. अशी मोहीम शासकीय स्तरावर सुद्धा करण्यात आली आणि आजही ती चालू आहे. आता मात्र परिस्थिती वेगळी आहे. दिवसेंदिवस झाडांचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे आता झाडे लावा, झाडे वाचवा अशी म्हणण्याची वेळ आपल्यावर आली आहे. तेव्हा हा संशोधनाचा महत्त्वाचा भाग जरी असला तरी प्रत्येकाने पावसाळ्यात किमान एक तरी झाड लावले पाहिजे. जी झाडे तोडली जातील त्यांना विरोध केला पाहिजे. एक झाड तोडल्यास किमान दोन झाडे लावली पाहिजेत. तरच झाडे वाचतील आणि पर्यावरणपूरक वातावरण राहील.

पृथ्वीवर आज जे काही मानवाचे अस्तित्व आहे त्याचे एकमेव कारण म्हणजे वृक्ष. त्यासाठी नागरिकांना झाडांचे महत्त्व समजून सांगितले पाहिजे. आज राज्यातील प्रत्येक गावामध्ये 'झाडे लावा, झाडे वाचवा' हा उपक्रम राबविला गेला पाहिजे. तसेच या उपक्रमाबरोबर आज पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी 'एक व्यक्ती एक झाड' लावले पाहिजे. हा उपक्रम प्रत्येक घराघरात राबवायला हवा. तरच वाढत्या तापमानाला आळा बसेल. त्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे. तरच नागरिक झाडे लावण्यास व त्यांचे संगोपन करण्यास प्रोत्साहित होतील. तेव्हा झाडे लावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे. झाडांचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले पाहिजे. आपण झाडांशिवाय जगू शकत नाही. हे नागरिकांना पटवून सांगितले पाहिजे. गावात झाडे वाचविण्यासाठी जनजागृती रॅली काढली पाहिजे. गावामध्ये मोक्याच्या ठिकाणी झाडांचे महत्त्व सांगणारे फलक लावले पाहिजेत. गावातील नागरिकांना जागृत करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून व्याख्याने आयोजित करावीत. गाव पातळीवर प्रत्येक घरानुसार झाडांचे वाटप करावे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडांची लागवड करावी. मात्र याचे आजच्या नवीन पिढीला काहीही देणे-घेणे नाही असेच दिसते. घरात कृत्रिम थंडगार हवा असली म्हणजे झाले. त्यासाठी आई-वडील काय करतात त्याचे त्यांना काहीच देणे नसते. झाडे लावण्यापेक्षा घरात मनीप्लँट लावणे मुले पसंत करतात. म्हणे यामुळे घरात पैसा येतो, इतका अडाणीपणा. तेव्हा सर्वांनी झाडांचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. पुढील वर्षी असे न म्हणता, या वर्षापासून मी झाडे लावून त्यांचे मी संगोपन करेन असे ध्येय प्रत्येकांनी ठेवले पाहिजे. कारण आपल्याला झाडे प्राणवायू देत असतात याची जाणीव असायला हवी. एकवेळ घनदाट दिसणारी हिरवीगार जंगले आता ओसाड दिसत आहेत. ज्याठिकाणी सुपीक जमीन होती त्या जमिनीतून शेतकरी राजा सोन्याचे गोठे पिकवत होता. आता त्याठिकाणी सिमेंटच्या गगनचुंबी इमारती दिसत आहेत. याचे कारण मानवाच्या गरजांमुळे झाडांची कत्तल होताना दिसत आहे. त्यामुळे जास्त उकाडा आणि पावसाचे कमी होत जाणारे प्रमाण याला आपणच जबाबदार आहेत. झाडांमुळे आपल्याला पुरेशी शुद्ध हवा, पिण्यासाठी पाणी व हवामान नियंत्रित करण्यात मदत होते. कारण झाडे ही नैसर्गिक संसाधने मानवाला पुरवीत असतात. आतापर्यंत आपण झाडे लावा, झाडे जगवा असे पावसाळा सुरू झाल्यावर म्हणत होतो. आता तसे म्हणून चालणार नाही. तसेच झाडांना खड्डे खोदून चालणार नाही.अलीकडे खोदलेले खड्डे सुद्धा चोरीला जातात. तेव्हा अगोदर झाडांची रोपे घेऊन येऊन जसे खड्डे खोदले जातील त्याप्रमाणे रोपे सुद्धा लावली पाहिजे. झाडांच्या सुरक्षिततेसाठी कुंपण सुद्धा घातले पाहिजे. झाडे लहान असताना त्याची देखभाल करावी. तसेच झाडे मोठी झाल्यावर ती तोडणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी.

आपण सर्वजण दरवर्षी ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करीत असलो तरी जागतिक तापमानात वाढ होत आहे, याचा विचार होणे आवश्यक आहे. तसेच या दिवशी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी पर्यावरणविषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. हा दिवस आपल्या देशात 'जंगले निसर्ग तुमच्या सेवेत' आणि 'प्लास्टिक प्रदूषणावर मात करा' या थीमसह आयोजित केला आहे. जागतिक पर्यावरण दिनाची आपल्या देशातील थीम लक्षात घेऊन देशातील तापमानाचा विचार करता पुढील वर्षी 'झाडे लावा, झाडे वाचवा'अशी थीम भारत सरकारने जाहीर करावी. त्या अगोदर देशातील प्रत्येक नागरिकांनी झाडे लावा,स झाडे वाचवा वचन बद्ध होऊ या.

# खाद्यतेल आणि स्वयंपूर्णता

भारतात खनिज तेल , सोने आणि त्याच्या खालोखाल खाद्यतेलाच्या आयातीसाठी परकीय चलन खर्च होते. खाद्यतेलाच्या संदर्भात आत्मनिर्भर होण्याची घोषणा वारंवार केली जात असली तरी प्रत्यक्षात खाद्यतेलाची आयात दरवर्षी वाढत आहे. कारण आपली खाद्यतेलाची मागणी वर्षाला सुमारे ४.३ टक्क्यांनी वाढते आहे आणि देशांतर्गत उत्पादन सुमारे २.२ टक्क्यांनी वाढत आहे.

खाद्यतेलाची वाढती गरज आपण प्रामुख्याने पामतेल आयात करून भागवितो. आपण पामतेल इंडोनेशिया व मलेशिया या देशांमधून आयात करतो. कोणत्याही कारणामुळे हा पामतेलाचा पुरवठा खंडित झाला, तर देशात हाहाकार होईल. कारण आपली खाद्यतेलाची आयात आपल्या एकूण मागणीच्या ६० टक्के एवढी प्रचंड आहे. त्यामुळे पामतेलाची आयात बंद झाली, तर देशातील खाद्यतेलाच्या किमती गगनाला भिडतील आणि गोरगरीब लोकांना फोडणीसाठी तेल विकत घेणे परवडणार नाही. या कारणासाठी देशात तेलबियांच्या उत्पादनात लक्षणीय प्रमाणात वाढ करणे नितांत गरजेचे आहे. सध्या खाद्यतेलाच्या आयातीसाठी आपले वर्षाला सुमारे एक लाख ३८ हजार कोटी रुपये खर्च होतात. आणि ही रक्कम आपल्याला डॉलरमध्ये चुकती करावी लागते. आपण खाद्यतेलाच्या संदर्भात आत्मनिर्भर झालो, तर परकीय चलनाचा हा बाहेर जाणारा ओघ थांबेल आणि ते पैसे आपल्या शेतकऱ्यांना तेलबियांची किंमत म्हणून मिळतील. खाद्यतेलाच्या संदर्भात आत्मनिर्भर होणे ही बाब वाटते तेवढी अवघड नाही. परंतु, तेलबियांच्या किमती वाढवून, शेतकरी मोठ्या प्रमाणावर तेलबिया पिकवितील असे कोणाला वाटत असेल, तर तेदेखील चूक आहे. तेलबियांचे उत्पादन वाढण्यासाठी केवळ त्यांच्या किमतीत वाढ केल्यामुळे फारसा फरक पडणार नाही, तर त्याच्याबरोबर अधिक उत्पादक वाणांचा विकास, सिंचनाची सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे यासारख्या अनेक गोष्टी कराव्या लागतील.



भुईमूग हे आपल्या देशातील एक महत्त्वाचे पीक आहे. या पिकाचे दर हेक्टरी सरासरी उत्पादन १३३० किलो एवढे कमी आहे. गुजरात राज्यात ते १८६३ किलो आहे. चीनमध्ये ते ३९१३ किलो एवढे प्रचंड आहे. उत्पादनातील या तफावतीमागील प्रमुख कारण सिंचनाची शाश्वत सुविधा हे आहे. भुईमुगाच्या पिकाला शाश्वत सिंचनाची सुविधा मिळाली, तर उत्पादनात लक्षणीय प्रमाणात वाढ होते, हे वास्तव आपण लक्षात घेतले पाहिजे.

भुईमूग या पिकाला ऊस वा भात या पिकांप्रमाणे भरमसाट पाणी लागत नाही. त्यामुळे भुईमूग या पिकासाठी खात्रीशीर सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यास फारशी अडचण निर्माण होणार नाही. उदाहरणार्थ, पंजाब व हरियाणा या राज्यांत खरीप हंगामात भाताचे पीक न घेता भुईमुगाचे पीक घेतले तर भूगर्भातील पाण्याचा उपसा लक्षणीय प्रमाणात कमी होईल आणि भूगर्भातील पाण्याचा साठा दर वर्षी वाढत जाईल. पंजाब व हरियाणा या राज्यांमध्ये असा बदल होणे हे आज नितांत गरजेचे बनले आहे. महाराष्ट्र राज्यात धरणे व बंधारे यांची पाणी साठविण्याची क्षमता ६०,००० दशलक्ष घनमीटर एवढी प्रचंड आहे. या पाण्याचा वापर प्रामुख्याने उसाच्या शेतीसाठी केला जातो. भारतात सध्या गरजेपेक्षा जास्त साखरेची निर्मिती होत असल्यामुळे महाराष्ट्रात उसाच्या खालील क्षेत्र कमी केल्यास कोणाचेही नुकसान होणार नाही. उसाखालचे क्षेत्र एक हेक्टर कमी केले, तर वाचणाऱ्या पाण्यात सुमारे सहा हेक्टर क्षेत्रावर भुईमुगाचे पीक घेता येईल.

धरणामधून सोडलेले पाणी उघड्या कालव्यांद्वारे शेतांपर्यंत पोहोचविले जाते. वहनाच्या या प्रक्रियेत कालव्यांमधून होणाऱ्या गळतीमुळे व प्रामुख्याने उन्हामुळे होणाऱ्या बाष्पीभवनामुळे किमान ७५ टक्के पाणी शेतापर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे पाणी वाहून नेण्यासाठी उघड्या कालव्यांच्या ऐवजी पाइप वापरणे योग्य ठरेल. हे काम खूप खर्चीक असल्यामुळे ते टप्प्याटप्प्याने करावे लागेल. असा बदल केल्यास राज्यात सिंचनासाठी भरपूर पाणी उपलब्ध होईल. अशा खर्चाचा काही भार लाभधारक शेतकऱ्यांनी उचलावा. त्यासाठी बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज द्यावे. भुईमूग या पिकाच्या संदर्भात एवढी विस्ताराने चर्चा करण्यामागची दोन महत्त्वाची कारणे म्हणजे भुईमुगात तेलाचे प्रमाण सुमारे ५० टक्के एवढे प्रचंड असते. दुसरे कारण भुईमुगाचे तेल हे बहुसंख्य भारतीयांचे पारंपरिक खाद्यतेल आहे.

बरेच उत्तर भारतीय मोहरीच्या (राईच्या) तेलाचा वापर करतात. राईच्या नवीन अधिक उत्पादक वाणाच्या संदर्भात बरीच चर्चा प्रसार माध्यमांत गाजली. या वाणाच्या लागवडीला प्रतिबंध करावा, म्हणून काही लोकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सुमारे तीन वर्षांपूर्वी केंद्र सरकारने राईच्या संबंधित वाणाच्या लागवडीचा मार्ग खुला केला. या नवीन वाणामुळे राईच्या उत्पादनात सुमारे २० टक्के वाढ होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात या नवीन वाणाची किती क्षेत्रावर लागवड झाली आणि उत्पादनात किती वाढ झाली, या बाबींची माहिती बहुधा प्रसिद्ध झाली नसावी. त्यामुळे खाद्यतेलाच्या आत्मनिर्भरतेच्या संदर्भातील माहिती लोकांना कळलेली नाही.

आपल्या देशात पूर्वापार शेंगदाणा तेल व राईचे तेल याचबरोबर करडईचे तेल तसेच अल्प प्रमाणात नारळाचे तेल व तिळाचे तेल यांचा वापर खाद्यतेल म्हणून केला जातो. त्यामुळे अशा पिकांच्या खालचे क्षेत्र वाढवून उत्पादनवाढ साध्य करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. अलीकडच्या काळात भाताच्या टरफलापासून राइस ब्रान हे खाद्यतेलही उत्पादित केले जाते. हे खाद्यतेलही शेंगदाणा तेल व करडई तेल यांच्याप्रमाणे आरोग्यदायी आहे. तसेच ते लोकप्रियही झाले आहे.भारताला खाद्यतेलाच्या संदर्भात स्वयंपूर्ण व्हायचे असेल तर भुईमूग, करडई आणि राई या तेलबियांच्या उत्पादनात लक्षणीय प्रमाणात वाढ करण्यासाठी नेटाने प्रयत्न करायला हवेत. नुकताच नीती आयोगाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार २०४७-४८ पर्यंत तांदूळ आणि गहू या तृणधान्यांचे उत्पादन मागणीपेक्षा खूप जास्त होणार आहे. त्यामुळे तृणधान्यांच्या लागवडीखालील क्षेत्रात कपात करून तेलबिया व कडधान्ये यांच्याखालील क्षेत्रात वाढ करणे गरजेचे आहे. त्यासाठी तृणधान्यांच्या किमान आधारभावात केल्या जाणाऱ्या वाढीचा दर हळूहळू कमी करायला हवा आणि तेलबिया व कडधान्ये यांच्या किमान आधारभावात घसघशीत वाढ करायला हवी. तसेच गरज भासल्यास तेलबिया सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभावाने खरेदी करण्यासाठी नाफेड या संस्थेला पुरेसा निधी उपलब्ध करून द्यायला हवा.नॅशनल ॲकडमी ऑफ ग्रिकल्चरल सायन्स या संस्थेच्या अभ्यासानुसार तेलबियांच्या संशोधन केंद्रांच्या शेतावर आणि शेतकऱ्यांच्या शेतावर आढळणारी उत्पादकतेमधील दरी ही सुमारे ६० टक्के एवढी प्रचंड आहे. हा फरक २० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आपल्याला यश प्राप्त करता आले, तर तेलबियांच्या उत्पादनात ४० टक्क्यांची वाढ होईल. ही उत्पादकतेमधील दरी भरून काढण्यासाठी आपल्याला कृषी विस्तारकांचे प्रशिक्षण करून त्यांना सक्षम करावे लागेल. देशाच्या पातळीवर पुरेशी कृषी विद्यापीठे आहेत. तेथील प्राध्यापकांना कृषी विस्तारकांचे प्रशिक्षण करायला सांगणे गरजेचे आहे. उपरोक्त सुचविलेल्या उपायांची अंमलबजावणी करणे खर्चीक वा अवघड नाही. त्यामुळे सरकारला ते काम सहजपणे पार पाडता येईल.

# बेकायदा बांधकामे अधिकारीही जबाबदार

शहरी भागापाठोपाठ ग्रामीण भागांतही अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम, नियमबाह्य बांधकाम या समस्येचा भस्मासूर फोफावू लागला आहे. मुंबई शहर व उपनगरातील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे यावर कितीही तोडगा काढला, उपाययोजना केल्या, तरी त्यावर मर्यादा पडणे स्वाभाविकच आहे. प्रशासकीय यंत्रणांच्या उपाययोजनांना यश कधीही मिळणार नाही. कारण मुंबईची भौगोलिक परिस्थिती, दररोज रोजगारासाठी-उपजीविकेसाठी आजही हजारोंच्या संख्येने येणारा लोंढा पाहता मुंबई शहर व मुंबईचे उपनगर अमिबासारखे जागा मिळेल त्या-त्या ठिकाणी अक्राळविक्राळ स्वरूपात फोफावत गेले आहे. अर्थात पालिका प्रशासनाच्या अतिक्रमण विभागाने वेळीच तत्परता दाखविली असती, तर कदाचित मुंबई शहर व उपनगरात वेगळेच चित्र आज पाहावयास मिळाले असते. ज्या-ज्या शहरांमध्ये अतिक्रमणाची समस्या वाढीस लागते, त्या-त्या शहरांतील प्रशासनातील अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांनाही दोषी धरून कारवाई केली असती, तर अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे त्यांचे काम केलेले दिसले असते.




मुंबई शहरालगतच्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर, पालघर, भिवंडी, नवी मुंबई, पनवेल, उरण परिसरालाही अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे या समस्येचा भस्मासूर निर्माण झाला असून बकालपणाचाही उद्रेक झाला आहे. मुळातच ज्या-ज्या वेळी प्रशासनाकडून समस्यांकडे कानाडोळा केला जातो, अतिक्रमणाला खतपाणी घातले जाते, त्या-त्या वेळी शहराला बकालपणाचा विळखा बसण्यास फारसा वेळ लागत नाही. अतिक्रमणाला, बकालपणाला त्या-त्या भागांतील स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन जबाबदार असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयानेही नोंदविले आहे. ठाण्यातील अतिक्रमणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने ताशेरे ओढल्याने अतिक्रमणाच्या समस्येचे गांभीर्य उघडकीस आले. ठाण्यातील १७ बेकायदा बांधकामांवरील कारवाईत दिरंगाई केल्याप्रकरणी तत्कालिन सहाय्यक आयुक्तांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती ठाणे महापालिकेतर्फे उच्च न्यायालयात देण्यात आली, तर बेकायदा बांधकामांच्या पाडकाम कारवाईसाठी येणाऱ्या खर्चांपैकी १० टक्के रक्कम या बांधकामांसाठी जबाबदार असलेल्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याचा विचार करा, अशी सूचना उच्च न्यायालयाने ठाणे महानगरपालिकेला केली. याशिवाय, बेकायदा बांधकामांवर कारवाई न करण्यासाठी जबाबदार असल्याप्रकरणी तत्कालिन सहाय्यक आयुक्त फारूख शेख यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आल्यावर त्यांना निलंबित करण्यात आल्याचेही महापालिकेच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. याव्यतिरिक्त आणखी तीन सहाय्यक आयुक्त, तीन बीट मुकादम आणि एका बीट निरीक्षकालाही 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आल्याचे न्यायालयाला सांगितले गेले. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने ठाणे महापालिकेतर्फे राबवण्यात येणाऱ्या मोहिमेचे कौतुक केले. तसेच, बेकायदा बांधकामांबाबतचा ठाणे पॅटर्न राज्यभरात राबवण्याचे मत पुन्हा एकदा व्यक्त केले. बेकायदा बांधकामे तुमच्या डोळ्यांसमोर उभी राहतात आणि महापालिकेकडून त्यांना नोटिसा बजावण्याशिवाय कोणतीही कारवाई केली जात नाही. ही स्थिती अशीच राहिली, तर ठाण्यात अराजकतेची स्थिती निर्माण होईल, अशा शब्दांत बेकायदा बांधकामांवरील कारवाईतील निष्क्रियतेवरून न्यायालयाने मागील सलग दोन सुनावणीच्या वेळी फटकारले होते. त्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेने बेकायदा बांधकामांवरील आणि या कारवाईत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवरील कारवाईची माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयाला दिली. मुळात सरकारी जागेवर ज्या वेळी मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्या निर्माण होत असतात, व्यापक स्वरूपात चाळी उभारल्या जातात. त्या चाळी, झोपडपट्ट्या एका दिवसामध्ये निर्माण होत नाहीत, त्यासाठी काही दिवसांचा कालावधी जात असतो. चाळी, झोपडपट्ट्यांची कामे सुरू असताना महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने वेळोवेळी कारवाईचा हातोडा उगारला असता, तर सरकारी जमिनीवर, सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणालाही मर्यादा पडल्या असत्या. शहरांच्या बकालपणाला केवळ राजकीय घटक जबाबदार नसतात, तर पूर्णपणे प्रशासकीय घटकच कारणीभूत असतात.

अतिक्रमण विभागाच्या उदासीनतेमुळे अनधिकृत बांधकामे फोफावली आहेत, अतिक्रमणे विस्तारली आहेत, हे कोणालाही नाकारता येणार नाही. आज शहरी, निमशहरी भागातील रस्त्यांवर, पदपथांवर फेरीवाल्यांनी व्यवसायानिमित्त अतिक्रमण केले आहे. फेरीवाल्यांकडून प्रत्येक महिन्याला आर्थिक मलिदा मिळत असल्यामुळे अतिक्रमण विभाग फेरीवाल्यांवर कारवाई करत नाही. फेरीवाल्यांचे बस्तान बसल्यावर हेच फेरीवाले कारवाई करण्यासाठी आलेल्या पालिका अधिकाऱ्यांवर हल्ले करत असल्याच्या घटना घडतात. कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ, असे म्हटले जाते, त्याचीच प्रचिती कारवाईसाठी आलेल्या अधिकाऱ्यांवरचे हल्ले अशा घटनांमधून येत असते. शहरांमध्ये अनधिकृत बॅनर, होर्डिंगच्या समस्येचा भस्मासूरही गेल्या काही वर्षांमध्ये फोफावला आहे. अनधिकृत बॅनर व होर्डिंगमुळे परिसराला बकालपणा येत असतो. अनधिकृत बॅनर व होर्डिंग हे राजकीय घटकांचे असल्यामुळे महापालिकेचा अतिक्रमण विभाग कारवाईचे धाडस दाखवत नाही. अनधिकृत बॅनर व होर्डिंग लावणाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे पालिका प्रशासनाला अधिकार असतानाही अशा स्वरूपात गुन्हे दाखल करण्याचे धाडस अतिक्रमण विभागाकडून दाखविले जात नाही. पदपथ व रस्त्याच्या काही भागांचे अस्तित्व संशोधनाचे विषय बनले आहेत. अनधिकृत बॅनरमुळे महसूल बुडतोय, बकालपणा वाढतोय, पण अतिक्रमण विभागाला त्याचे काहीही देणे-घेणे नसते. शहरातील समस्यांबाबत, बकालपणाबाबत प्रशासनाला धडा शिकविणे गरजेचे होते. मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेली भूमिका रास्त असून या निकालाचे जनसामान्यांकडून स्वागत करण्यात येत आहे. गुन्हा करणाऱ्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. आज कोणत्याही शहराच्या वाताहतीस, नागरी समस्यांच्या उद्रेकास, नागरी सुविधांच्या दुष्काळास पालिका प्रशासनच जबाबदार असल्याने कोठे तरी त्या गोष्टींचे खापर त्यांच्यावरही फोडणे आवश्यक होते.

# विनाअनुदानित शिक्षकांच्या आंदोलनाला अखेर यश:अधिवेशन संपल्यानंतर खात्यात येईल पगार

## राज्याचे मंत्री गिरीश महाजनांची आंदोलनस्थळी घोषणा

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुंबईतील आझाद मैदानात गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या विनाअनुदानित शिक्षकांच्या आंदोलनाला अखेर यश मिळाले आहे. शिक्षकांच्या विविध मागण्यांवर तोडगा काढत भाजप नेते आणि राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी आज सरकारनचे प्रतिनिधी म्हणून आंदोलनस्थळी भेट दिली आणि सरकारतर्फे सर्व मागण्या मान्य करण्याची घोषणा केली. तसेच अधिवेशन संपल्यानंतर खात्यात पैसे पडतील, असे महाजन यांनी सांगितले.राज्यातील सुमारे ५,००० खासगी विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने शासकीय अनुदान देण्याचा निर्णय ऑक्टोबर २०२४ मधील विधानमंडळ अधिवेशनात घेण्यात आला होता. मात्र, त्या निर्णयाला आता दहा महिने उलटूनही प्रत्यक्ष निधीच्या तरतुदीचा कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे या शाळांमधील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, सरकारच्या दिरंगाईविरोधात आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला होता. गेल्या पाच दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानात हे आंदोलन सुरू होते.



गिरीश महाजन म्हणाले की, आमची भूमिका सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारला तुमची काळजी आहे. आम्हाला माहिती आहे की, आपण सामान्य कुटुंबातील आहात. तुमची रोजीरोटी ही आहे, त्यामुळे अतिशय धाडसी निर्णय फडणवीसांनी त्यावेळी घेतला. त्यानुसार, २० टक्के, ४० टक्के त्यानंतर ६० टक्के दिले.सरकारी तिजोरीवरील आर्थिक संकटामुळे आमच्याकडून पुढचे टप्पे देण्यास उशीर झालेला आहे. तुम्ही याबाबत वारंवार मागणी करत होता. पण आता तुमचा पगारा प्रश्न मार्गी लागलेला आहे. आम्हाला तुमच्या खात्यात पगार टाकायचाच आहे, असे गिरीश महाजन म्हणाले.याबाबत तुमच्या शिक्षकांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत ठरले आहे. पण या दोन-तीन दिवसात सर्व तांत्रिक बाजू समजावून घेऊन येत्या १८ तारखेला अधिवेशन संपेल तेव्हा तुमच्या खात्यात पैसे पडलेले असतील. यात कोणताही बदल होणार नाही, अशी ग्वाही गिरीश महाजन यांनी आंदोलक विनाअनुदानित शिक्षकांना दिली.मी कुठुनही काढेन, काहीही करेन पण तुमच्या खात्यात केवळ एका महिन्यापुरता नाही, तर हा पगार आता शेवटपर्यंत नियमितपणे मिळेल. ठरलेल्या टप्प्याप्रमाणे जो काही पगार असेल, तो तुमच्या खात्यात जमा केला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. हा त्यांचा शब्द आहे, असेही गिरीश महाजन म्हणाले.दरम्यान, राज्यामध्ये सध्या ५,८४४ अंशतः अनुदानित खासगी शाळा आहेत. यामध्ये ८२० प्राथमिक, १,९८४ माध्यमिक व ३,०४० उच्च माध्यमिक शाळा आहेत. या शाळांमध्ये एकूण ३,५१३ प्राथमिक, २,३८० माध्यमिक व ३,०४३ उच्च माध्यमिक तुकड्या कार्यरत आहेत. एकूण ८,६०२ प्राथमिक शिक्षक, २४,०२८ माध्यमिक शिक्षक आणि १६,९३२ उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या शाळांमध्ये कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून पगाराविना काम करत असूनही शाळांचा शैक्षणिक दर्जा टिकवून ठेवण्यात त्यांनी मेहनत घेतली आहे. मात्र शासनाच्या अशा धोरणामुळे त्यांच्या रोजच्या जीवनावर गंभीर परिणाम होत आहे. आता केवळ आश्वासनांवर न चालता प्रत्यक्ष निधी वाटपाचे आदेश हवेत, अशी शिक्षकांची स्पष्ट मागणी होती.

# विकासासाठी प्रामाणिक राजकारण्यांची गरज-बाळराजे पवार

**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील बाजारपेठ नावा रुपाला आली म्हणजे, आपल्या गावांची प्रतिष्ठा वाढत असते. म्हणून, गावांचा विकास होणे आवश्यक आहे. यासाठी, प्रमाणिक राजकारणी लोकांची गरज असते. कारण राजकारणात आणि व्यापारात ब्रॅण्ड महत्त्वाचाच असतो, असे प्रतिपादन गेवराईचे युवानेते बाळराजे पवार यांनी येथे एका मेट्रो मोबाईल दालनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना केले आहे. बाळराजे पवार म्हणाले की, गेली पंचवीस वर्षांपूर्वीची गेवराई आपण सर्वांनी अनभवली आहे. त्यावेळेस शहरातील बाजारांची काय परिस्थिती होती. दोन हजारांची साडी खरेदी करण्यासाठी नागरिकांना गेवराईहून शहागडला जावे लागत होते. अशी परिस्थिती होती तेव्हाच मी ठरवलं होतं की, गावांची ही परस्थिती बदलण्यासाठी आपल्याला राजकारणात सक्रिय व्हावे लागेल आणि मी निर्णयही घेतला होता. परंतु मला निवडणूक लढवता येत नव्हती. पण माझ्या गावाचे विचित्र चित्र बदल्याण्यासाठी मी



नगरपालिकेची निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. एकदा मला अपयश आले. पण दुसऱ्यांदा मात्र गेवराईकरांनी नगरपालिका माझ्या ताब्यात दिली. तेव्हा पासून माजी आमदार लक्ष्मण आण्णांनी प्रमाणिक प्रयत्न करुन गेवराईची बदलेली परस्थिती आज आपल्या समोर आहे. आज तलावाड्यातुन येण्यासाठी अवघे १५ मिनिट लागतात तर राक्षसभुवन ते गेवराई साठी फक्त २० मिनिट लागतात. हे सर्व गेवराई मतदारसंघाचे तत्कालीन आमदार लक्ष्मण आण्णांच्या प्रामाणिकपणामुळे घडलेले आहे हे कोणीही नाकारु शकत नाही. आज गेवराई शहरातील बाजारपेठेत आर्थिक उलाढाल होऊ लागली आहे. त्यामुळे व्यापारात व राजकारणात ब्रँड महत्त्वाचाच असतो, असे प्रतिपादन युवानेते बाळराजे पवार यांनी केले आहे

बुधवार, दिनांक ९ जुलै रोजी गेवराई शहरातील शास्त्री चौकातील जमीर बागवान व अरबाज बागवान यांच्या न्यु मेट्रो मोबाईल शॉपीचे उद्घाटन बाळराजे पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जे.डी. शाह, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, भगवान घुबार्डे, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, याहिया खॉन पठाण, सय्यद एजाज, विष्णुपंत आतकरे, जानमुहम्मद बागवान, जुनेद बागवान, निजाम पठाण, सचिन वावरे, शिवाजी कांळे, शेख इर्शाद, लक्ष्मण चव्हाण, वाजेद चौधरी, शेख निजाम, शेख रफीक, प्रशांत राख, पिंटू साळवे, प्रकाश उपळकर, सतिष पवार, श्रीराम घाटुळ, अब्दुल गणी आदी उपस्थित होते. प्रारंभी मुर्तुजा उर्फ बबलू बागवान, जमीर बागवान, जहीर बागवान, अरबाज बागवान आदींनी सर्व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. बाळराजे पवार पुढे म्हणाले की, व्यापार करत असतांना आपण ग्राहकांना प्रमाणिकपणे सेवा दिली पाहिजे व आपण विकत असलेला माल ब्रँडेड असेल तरच आपले दुकान विचारत ग्राहक आपल्याकडे न बोलावता येत असतात. व्यवसायात कधी, कधी चढ उतारही येत असतात. पण त्यामुळे अजिबात खचून न जाता व्यापाऱ्यांनी धाडसाने उभे राहून चिकाटी व सातत्य ठेवुन व्यापार केल्यास यश नक्कीच मिळेल, असा अशावादही बाळराजे पवार यांनी शेवटी व्यक्त केला.

# रोटरीने माळरानावर केली १३० वृक्षांची लागवड



**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** एक पेड मां के नाम च्या घोषणा देत विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण केले. शाळेच्या माळरानावर रोटरीने १३० वृक्षांची लागवड करत, या वर्षी दोन हजार वृक्षांची लागवड व संगोपन करण्याचा संकल्प केला.

रोटरी क्लब अंबाजोगाई सिटीच्या वतीने शहरातील मुकुंदराज विद्यालय , लालनगर,क्रांतीनगर परिसरात असणाऱ्या उघड्या खडकाळ डोंगर भागात, स्मशान भूमीजवळ , शालेय विद्यार्थ्यां समवेत वृक्षारोपण करण्यात आले. एक पेड मां के नाम या घोषणा देत वृक्षारोपण केले. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी लावलेल्या वृक्षांना दररोज एक बाटली पाणी देण्याचे कबूल करीत झाडांची देखभाल करण्याचे वचन दिले.पर्यावरण पूरक हरित भविष्याचे प्रकल्पाची या उपक्रमाच्या माध्यमातून सुरुवात झाली .

या उपक्रमाचे प्रकल्प संचालक राजेंद्र घोडके यांनी या वर्षभरात दोन हजार वृक्षांची लागवड व संगोपन करण्याचा संकल्प केला. यावेळी रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी,प्रकल्प संचालक राजेंद्र घोडके,सह संचालक गोरख मुंडे,कल्याण काळे,धनराज सोळंकी,जगदीश जाजू,अरुण आसरडोहकर, प्रवीण चौकडा,भीमाशंकर शिंदे, अभिषेक मुंदडा,शाळेच्या मुख्याध्यापिका धायगुडे, जगन सरवदे यांच्यासह रोटरीचे सदस्य,लालनगर,क्रांतीनगर परिसरातील रहिवासी उपस्थित होते.

# गेवराई शहरातील विविध उपक्रमाबद्दल रोटरीने सहकार्य करावे-विक्रम मांडुरके

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील विविध विकास कामे व जनतेच्या हितार्थ राबविले जाणारे उपक्रम यासाठी प्रस्ताव व निधी नगर परिषदेकडे उपलब्ध असतो, मात्र त्याची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी, सुरक्षा, कामांचा दर्जा आणि मेंटेनन्स या गोष्टी तितक्यात महत्त्वाच्या आहेत. रोटरी क्लबने अनेक समाजोपयोगी उपक्रमास सहकार्य करावे, असे प्रतिपादन गेवराई नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक विक्रम मांडुरके यांनी केले. रोटरी क्लब ऑफ गेवराई यांच्यावतीने हरित क्रांतीचे प्रणेते तत्कालिन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीदिनी राज्यात कृषि दिन साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून १ जुलै २०२५ रोजी गेवराई येथील पत्रकार भवनात चार्टर्ड अकाउंटंट डे, डॉक्टर डे आणि एग्रीकल्चर डे या त्रिवेणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला रोटरी क्लबचे संस्थापक पॉल हॅरीस यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करण्यात आली . त्यानंतर मंचावरील अध्यक्ष मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, प्रमुख अतिथी वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरज कोठावळे, मंडल कृषि अधिकारी श्रीमती माळी, रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे चार्टर्ड अकाउंटंट रो.आदेश नहार यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकात रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा.रो. प्रा .राजेंद्र बरकसे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाचा हेतू स्पष्ट केला. या कार्यक्रमात डॉक्टर डे निमित्त ज्येष्ठ चिकित्सक डॉ.एच.बी. सोमाणी, डॉ.एस.आर.सिकची, डॉ. शेख इकबाल तसेच सनदी लेखापाल डे निमित्त स्वप्नील भुतडा, सुशील खिंवसरा, रो. रवींद्र गिरी आणि कृषी दिनानिमित्त प्रगतशील आदर्श शेतकरी सुदर्शन घोडके वडगावकर यांचा सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सुदर्शन घोडके व डॉ. सोमाणी यांनी सत्काराला उत्तर दिले. या कार्यक्रमात न.प. मुख्याधिकारी विक्रम मांडुरके व वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरज कोठावळे यांना रोटरी क्लबचे नियुक्तीपत्र देवून मानद सदस्यत्व बहाल करण्यात आले. तर सनदी लेखापाल सुशील खिंवसरा यांनी आर्थिक स्वातंत्र्य या विषयावर उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले . या कार्यक्रमात डॉ.सुरज कोठावळे यांनी रोटरी क्लब व त्यांनी हाती घेतलेल्या विविध आरोग्यविषयक उपक्रमात उपजिल्हा रुग्णालय प्रशासन व कर्मचारी योग्य ती मदत व सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले .डिस्ट्रिक्ट डायरेक्टर सीए रो.आदेश नहार यांनी आपल्या भाषणात रोटरी क्लबची सुरुवात आणि अल्पावधीत रोटरी क्लबने केलेले विविध समाज उपयोगी उपक्रमाचे कौतुक केले . यापुढेही सर्वांना एकत्र घेऊन रोटरी क्लबचे कार्य अविरत चालू ठेवावे, असेही त्यांनी सुचवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोटरी क्लबचे प्रोजेक्ट चेअरमन धर्मराज करपे यांनी केले. आभार टीआरएफ डायरेक्टर रो.डॉ.विजयकुमार सिकची यांनी मानले.

## तातडीने कारवाई करा अन्यथा कायदा सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होईल-ज्योती गायकवाड

**मुंबई । प्रतिनिधी**

धारावीतील शताब्दी नगर, आंबेडकर नगर परिसरातील २५० पात्र झोपडीधारकांनी स्थलांतरासाठीचे चाळीस हजार रुपये भरणा केला असताना त्यांना निवासी व्यवस्थेत सामावून घेतलेले नाहीआंदोलने होऊनही अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत आहेत, तातडीने कारवाई करा अन्यथा कायदा सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होईल याकडे आज विधानसभेत धारावीच्या काँग्रेस सदस्य ज्योती गायकवाड यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे लक्ष वेधले. सदस्य ज्योती गायकवाड म्हणाल्या,या गंभीर विषयावर बैठक होऊन आश्वासनेही देण्यात आली. मात्र अंमलबजावणी नाही.पुनर्विकास प्रकल्प अधिकारी यांना अनेकदा वस्तुस्थिती सांगूनही ते निवासासाठी असलेल्या निवासव्यवस्थांची या २५०झोपडी धारकांसाठी व्यवस्था करत नाहीत.ते स्वतः कार्यालयात जागेवर नसतात.अदानी घरे देऊ शकत नाही अशी लोकांची भावना होत आहे. ज्योती गायकवाड म्हणाल्या, या २५० झोपडीधारकांना रखडवून मध्येच अनेक झोपड्यांचे स्थलांतर कसे झाले.त्याचे डेब्रिज मध्येच पडून आहे.त्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. लोकांत असंतोष आहे. तातडीने लोकांना न्याय द्यावा. यापूर्वीही प्रश्न उपस्थित केले त्याचीही उत्तरे अद्याप नाही.

# बाबासाहेब आंबेडकरांमुळेच आम्ही मंत्री होऊ शकलो-उदय सामंत

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान दिले या संविधानावरच देशाचे मार्गक्रमण सुरु असून त्यांच्यामुळेच मी आणि भरत गोगावले सारखे लोक राज्याचे मंत्री होऊ शकलो असे कृतज्ञतापुर्ण उदगार राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी काढले . दलित पँथरच्या आगामी जडणघडणीत आम्ही सदैव आपल्या सोबत असू अशी ग्वाहीही त्यांनी दिली .

दलित पँथरचा ५३ वा वर्धापन दिन मुंबईच्या नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे संपन्न झाला . दलित पँथरचे अध्यक्ष सुखदेव सोनावणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमास पर्यटन मंत्री शम्भूराज देसाई उदघाटन म्हणून तर उद्योग मंत्री उदय सामंत ,रोजगार हमी मंत्री भरत गोगावले आमदार प्रसाद लाड , दलित




पँथर युवा अध्यक्ष शुभम सोनावणे,प्रकाश साळवे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते यावेळी राज्यातील प्रतिथयश उद्योगपती,साहीत्यिक व चळवळीत योगदान दिलेल्या व्यक्तींचा मानपत्र,शाल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला . रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड या बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रत्नागिरी जिल्ह्याचा पालकमंत्री असल्याचा आपल्याला अभिमान आहे असे सांगतानाच या ठिकाणी आपल्या सरकारने बाबासाहेबांची शासकीय जयंतीला सुरुवात केली आहे परदेशात गेलो असता बाबासाहेबांनी वास्तव्य केलेल्या लंडनमधील घर पाहून ऊर अभिमानाने भरून आला . आज त्यांच्यामुळेच मी आणि गोगावले राज्याचे मंत्री होऊ शकले असे उदगार सामंत यांनी काढले . दलित पँथरचा इतिहास आपल्याला ज्ञात आहे हि चळवळ वाढली पाहिजे यासाठी आम्ही सदैव पँथरच्या सोबत राहू असे ते म्हणाले . डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक क्रांती केलेल्या महाड चवदार ताळ्यावर शासकीय मानवंदना सुरु केल्याचा आपल्याला अभिमान आहे रायगड जिल्हा हा ऐतिहासिक जिल्हा आहे या ठिकाणी छत्रपतींनी शिवाजी महाराजांनी स्वराज्याची राजधानी निर्माण केली तर बाबासाहेबानी सामाजिक क्रांती केली अशा क्रांतिभूमीला दोन्ही महापुरुषांचे पाय लागले याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे असे भरत गोगावले यावेळी बोलताना म्हणाले . दलित पँथरची चळवळ तत्कालीन व्यवस्थेविरोधात सुरु होती या चळवळीला ५३ वर्ष पूर्ण होत असून या चळवळीला बाळ देण्याचे काम केले जाईल अशी ग्वाहीही गोगावले यांनी यावेळी बोलताना दिली . सदर प्रसंगी दलित पँथरचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केजच्या रस्त्यावर विक्रीसाठी आले चमकणारे दगड; दगड नव्हे तर ही आहे खनिज सैंधव मीठ

**केज । गौतम बचुटे**

स्वयंपाक जरी कितीही छान केला त्यात विविध मसाले वापरले तरी त्याला मिठाशिवाय चव येत नाही. तशी मिठाची किंमत खूप कमी असते पण त्या शिवाय चव येत नाही. मीठ हे दोन प्रकारचे आहे. समुद्राच्या पाण्यापासून मिठागारांमध्ये तयार होणारे मीठ सामान्यत आपण वापरतो आणि आता विविध कंपन्यांचे आयोडिन युक्त मीठ आले असल्याने पूर्वी मिळणारे काळसर आणि पावसाळ्यात आर्द्रता शोषून घेणारे खडे मीठ याचा वापर जवळ जवळ कमी झालेला आहे. तर आणखी एक मिठाचा प्रकार आहे तो म्हणजे सैंधव मीठ. हे सैंधव मीठ हे खाणीतून मिळते. हे मीठ नैसर्गिकरित्या तयार होते, त्यावर जास्त प्रक्रिया केलेली नसते.सुमारे पाचशे दशलक्ष वर्षांपूर्वी समुद्र आणि प्रस्तर भूखंड यातील घडामोडी होऊन समुद्राच्या काही भागात भूमी तयार होत गेली. येथील मीठ या पृष्ठभूमीवर तसेच राहिले. या सैंधव मिठामध्ये झिंक, लोह, मँगनीज, मॅग्नेशिअम, पोटॅशिअम व इतर द्रव्यांचा परिणाम होत गेला आणि याचे यथावकाश भूगर्भात मिठागरे तयार झाली.

अशाच थोडेसे पांढरट गुलाबी रंगाचे दिसणारे रांगोळी सारख्या स्फटिकाचे मोठ मोठे दगडासारखे दिसणारे उन्हात लांबून बर्फाच्या लादीसारखे दिसणारे सैंधव मीठ घेऊन परप्रांतीय राजस्थान राज्यातील कुटुंबे ही केज शहरात मुख्य रस्त्यावर आलेले आहेत.

_रंगः– सामान्यतः पांढरा किंवा गुलाबी, कधीकधी गडद लाल रंगाचे खडे असू शकतात.

_पोतः– मोठे खडे किंवा बारीक स्फटिकाच्या स्वरूपात असते.

_चवः– सामान्य मीठापेक्षा थोडे कमी खारट आणि किंचित गोडसर चव असते.

_सैंधव मीठाचे गुणधर्मः– यात कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि लोह यांसारखी अनेक खनिजे असतात.

_नैसर्गिकः– हे मीठ नैसर्गिकरित्या तयार होते, त्यावर जास्त प्रक्रिया केलेली नसते. आणि हे सैंधव मीठ उपवासाला देखील वापरले जाते.

_खनिजेः– यात कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि लोह यांसारखी अनेक खनिजे असतात.

_भारतात सैंधव मिठाचे साठे कुठे आहेत ?:– आपल्या देशात प्रामुख्याने हिमाचल प्रदेश आणि गुजरात राज्यांमध्ये आढळते. हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील द्रांग आणि गुमा येथे सैंधव मिठाच्या खाणी आहेत, तर गुजरातमध्ये कच्छच्या रणाजवळ मिठागरे आहेत. तसेच पाकिस्तानच्या लाहोर प्रांतात याचे साठे आढळतात.




**(टीप :– या बातमी संदर्भातील बरीचशी माहिती नेट वर सर्च करून घेतलेली आहे.)**

स्वयंपाक जरी कितीही छान केला त्यात विविध मसाले वापरले तरी त्याला मिठाशिवाय चव येत नाही. तशी मिठाची किंमत खूप कमी असते पण त्या शिवाय चव येत नाही. मीठ हे दोन प्रकारचे आहे. समुद्राच्या पाण्यापासून मिठागारांमध्ये तयार होणारे मीठ सामान्यत आपण वापरतो आणि आता विविध कंपन्यांचे आयोडिन युक्त मीठ आले असल्याने पूर्वी मिळणारे काळसर आणि पावसाळ्यात आर्द्रता शोषून घेणारे खडे मीठ याचा वापर जवळ जवळ कमी झालेला आहे. तर आणखी एक मिठाचा प्रकार आहे तो म्हणजे सैंधव मीठ. हे सैंधव मीठ हे खाणीतून मिळते. हे मीठ नैसर्गिकरित्या तयार होते, त्यावर जास्त प्रक्रिया केलेली नसते.सुमारे पाचशे दशलक्ष वर्षांपूर्वी समुद्र आणि प्रस्तर भूखंड यातील घडामोडी होऊन समुद्राच्या काही भागात भूमी तयार होत गेली. येथील मीठ या पृष्ठभूमीवर तसेच राहिले. या सैंधव मिठामध्ये झिंक, लोह, मँगनीज, मॅग्नेशिअम, पोटॅशिअम व इतर द्रव्यांचा परिणाम होत गेला आणि याचे यथावकाश भूगर्भात मिठागरे तयार झाली.

अशाच थोडेसे पांढरट गुलाबी रंगाचे दिसणारे रांगोळी सारख्या स्फटिकाचे मोठ मोठे दगडासारखे दिसणारे उन्हात लांबून बर्फाच्या लादीसारखे दिसणारे सैंधव मीठ घेऊन परप्रांतीय राजस्थान राज्यातील कुटुंबे ही केज शहरात मुख्य रस्त्यावर आलेले आहेत.

_रंगः– सामान्यतः पांढरा किंवा गुलाबी, कधीकधी गडद लाल रंगाचे खडे असू शकतात.

_पोतः– मोठे खडे किंवा बारीक स्फटिकाच्या स्वरूपात असते.

_चवः– सामान्य मीठापेक्षा थोडे कमी खारट आणि किंचित गोडसर चव असते.

_सैंधव मीठाचे गुणधर्मः– यात कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि लोह यांसारखी अनेक खनिजे असतात.

_नैसर्गिकः– हे मीठ नैसर्गिकरित्या तयार होते, त्यावर जास्त प्रक्रिया केलेली नसते. आणि हे सैंधव मीठ उपवासाला देखील वापरले जाते.

खनिजेः– यात कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि लोह यांसारखी अनेक खनिजे असतात.

भारतात सैंधव मिठाचे साठे कुठे आहेत ?:– आपल्या देशात प्रामुख्याने हिमाचल प्रदेश आणि गुजरात राज्यांमध्ये आढळते. हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील द्रांग आणि गुमा येथे सैंधव मिठाच्या खाणी आहेत, तर गुजरातमध्ये कच्छच्या रणाजवळ मिठागरे आहेत. तसेच पाकिस्तानच्या लाहोर प्रांतात याचे साठे आढळतात.

### सद्गुरु श्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने

# परळीत रविवारी 'दिव्य ज्योती जागृती संस्थान'च्या वतीने भव्य गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी शहरात आध्यात्मिकता व संस्कारांचे दीप प्रज्वलित करणाऱ्या 'दिव्य ज्योती जागृती संस्थान'च्या वतीने रविवार, दिनांक १३ जुलै रोजी हालगे गार्डन येथे गुरुपौर्णिमा महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.



सद्गुरु परम पूज्य श्री आशुतोषजी महाराज यांच्या दिव्य कृपाशीर्वादाने संपन्न होणाऱ्या या महोत्सवाची सुरुवात सकाळी १० वाजता सद्गुरु पूजन व आरतीने होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता भजन, कीर्तन व सत्संग अशा अध्यात्मिक कार्यक्रम होणार असून भक्तिरसात न्हालेलं वातावरण अनुभवण्याची सुवर्णसंधी लाभणार आहे.

कार्यक्रमाची सांगता महाप्रसाद वितरणाने होणार असून, परळी शहरासह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरुतत्त्वाची महती अनुभवावी, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही हा महोत्सव भक्तिभावाने भारलेला असून, परळीकरांसाठी हा एक आध्यात्मिक सोहळा ठरणार आहे.

### मराठी माणसाला मुंबईत घरासाठी आरक्षण मिळावं या मुद्यावर

# ठाकरे गटाचे आमदार अनिल परब आणि शिंदे गटाचे मंत्री शंभूराजे देसाई यांच्यात तुफानी शाब्दिक चकमक

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्य विधानपरिषदेत आज वातावरण चांगलेच तापले. विरोधी बाकांवरील ठाकरे गटाचे आमदार अनिल परब आणि महायुतीचे मंत्री शंभूराज देसाई यांच्या जोरदार हमरीतुमरी झाली. मराठी माणसाच्या मुद्यावर बोलताना ही खडाजंगी झाली आहे. दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या तुफानी शाब्दिक वादामुळे सभागृहात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी मुंबई आणि महानगर भागात आता मोठ्या प्रमाणावर पुनर्विकास सुरू आहे. यामध्ये उभ्या राहणाऱ्या इमारतींमधील ४० टक्के घरे मराठी माणसांसाठी राखीव



ठेवण्याची मागणी परब यांनी केली. सरकारने आता याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. महायुती सरकारकडून शंभूराज देसाई यांनी उत्तर देताना ठाकरे गटाला लक्ष्य केले. तुम्ही मराठी माणसासाठी काही केलं नाही असा आरोप त्यांनी केला. त्यावर अनिल परब हे संतापले आणि देसाई यांनी प्रत्युत्तर देत सरकार काय करणार हे सांगा असे म्हटले. मात्र, शंभूराज देसाई यांनी परब यांच्यावर टीकेचा भडिमार सुरू ठेवला. चर्चेदरम्यान अनिल परब यांनी शंभूराज देसाई यांच्यावर गंभीर आरोप करत म्हटले की,शंभूराज देसाई मंत्री असताना गद्दारी करत होते. या आरोपामुळे चिडलेले शंभूराज देसाई क्षणात आक्रमक झाले. त्यांनी परब यांना थेट प्रत्युत्तर दिले, तू गद्दार कोणाला बोलतोस? बाहेर ये, तुला दाखवतो! एवढ्यावरच न थांबता देसाई म्हणाले, तूच तर बूट चाटत होतास.! अशा शब्दांत त्यांनी अनिल परबांवर पलटवार केला.या दोन्ही नेत्यांमध्ये शाब्दिक चकमक सुरू असल्याने सभागृहाचे वातावरण चांगलेच तापले. अखेर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केले.

# दैनिक मराठवाडा साथीच्या वतीने आत्मलिंग शेटे यांचा सत्कार

**रळी वैजनाथ । प्रतिनिध**

मराठवाडा साथी परिवाराच्या वतीने परळी समाचार चे संपादक आत्मलिंग शेटे यांची भारतीय लघु व माध्यम वृत्तपत्र संघाच्या मराठवाडा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल गुरुपौर्णिमेचे औचित्य साधुन त्यांचा सत्कार करण्यात आला.



गेली ३५ वर्षापासून ते परळी समाचार हे वृत्तपत्र नियमितपणे चालवत आहेत. त्यांच्या या योगदानाबद्दल साथी परिवाराने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून शाल श्रीफळ व पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला. त्याप्रसंगी दैनिक मराठवाडा साथीचे अनिलजी गायकवाड, संतोष जुजगर, तसेच संघर्ष नेता चे संपादक मोहनराव वाव्हळे, पत्रकार जगदीश शिंदे, अक्षरधामचे संपादक बालाजी जगतकर, बालाजी ढगे, राजेश जगतकर रावसाहेब जगतकर इत्यादी सर्व पत्रकार उपस्थित होते.

तसेच बालाजी जगतकर यांची असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मेडियम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेच्या बीड जिल्हा सरचिटणीसपदी निवड झाल्याचे मराठवाडा अध्यक्ष आत्मलिंग शेटे यांनी जाहीर केले व त्यांचाही या कार्यक्रमात शाल पुष्पहार घालून स्वागत करण्यात आला. लवकरच संपूर्ण मराठवाड्यातील जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असल्याचे आत्मलिंग शेटे यांनी सांगितले.

# परशुराम आर्थिक विकास महामंडळ नक्की उत्कृष्ट कार्य करेल–कॅप्टन आशिष दामले

**केज (प्रतीनीधी)**–आपण सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे तीन लक्ष पर्यंत थेट कर्ज व १० लक्ष पर्यंत विनातारण कर्ज नक्कीच मिळेल शिक्षण साठी देशात १० लक्ष व परदेशात २० लक्ष शैक्षणिक कर्ज महामंडळ कडून मिळेल असा प्रस्ताव दिलेला आहे मंजुरी मिळताच आपण नव्या जोमाने काम करू आपण आम्हाला थेट बोलत चला आपण नक्कीच इतिहास घडऊ असे म्हणाले ना अजितदादा पवार यांनी परशुराम आर्थिक विकास महामंडळ ला निधी कमी पडणार नाही असे आश्वासन दिले आहे आणि निधी कसा आणायचा याची मला माहिती आहे असे परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांनी सांगितले.परशुराम आर्थिक विकास महामंडळ चे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले हे केज येथे भेटीसाठी आले असता शासकीय विश्रामगृह येथे त्यांचा सत्कार चतुर्वेद प्रतिष्ठान व समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती च्या वतीने करण्यात आला. यावेळी सामाजिक विविध विषयावर चर्चा करण्यात आली यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीयकृत बँका या विनातारण कर्ज देत नाहीत १० लक्ष पर्यंत विनातारण कर्ज द्यायचा असा नियम असतानाही बँका लक्ष देत नाहीत तसेच कागदपत्रे च्या नावाखाली परेशान करतात खाजगी बँका तयार असतात परंतु त्यांना तारण लागते अश्या परिस्थिती मध्ये अनेक ब्राह्मण तरुणांना त्रास सहन करावा लागतो याबद्दल आपण बँकाना तस्या सुचण्या द्याव्यात अशी मागणी कॅप्टन आशिष दामले यांच्याकडे केली. तसेच पुरोहित बांधवाना मानधन व ब्राह्मण संरक्षक कायदा या व इतर उर्वरित मागण्यासाठी आपण आम्हाला सहकार्य करावे अशी इच्छा देखील व्यक्त केली .यावेळी चतुर्वेद प्रतिष्ठान व समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती च्या वतीने कॅप्टन आशिष दामले यांचा सत्कार केला यावेळी धनंजय कुलकर्णी, श्रीनिवास केजकर, श्रीराम शेटे, अनंत कोकीळ, श्रीधर खोत, चंद्रकांत पाटील,ऋषिकेश जोशी, उदय कुलकर्णी, महेश येवतेकर, गुणवंत जोशी, यावेळी संघर्ष समितीचे उपोषण कर्ते दिपक रननवरे हे ही उपस्थित होते.

# फडणवीस सरकारला बदनाम करण्याचा शिंदेंच्या आमदारांचा प्रयत्न का ?:नाना पटोले यांचा सवाल

**मुंबई (वृत्तसंस्था)**

या सरकारमध्ये काय चालले आहे हे आपण पाहिले असेल. यामुळे सरकारची बदनामी झाली. संजय गायकवाड यांनी कर्मचाऱ्याला केलेली मारहाण ही देवेंद्र फडणवीस यांना बदनाम करण्यासाठी होती का असा प्रश्न निर्माण होत आहे, असे काँग्रेस नेते नाना पटोले यांनी म्हटले आहे.नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, राज्यात सत्तापक्षाच्या माध्यमातून जो गुंडाराज सुरू झाला आहे तो अशोभनीय आहे. कायदा हातात घेण्याची परंपरा या सरकारने सुरू केली आहे.आमदार संजय गायकवाड यांनी कॅन्टीनच्या कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीबद्दल पटोलेंनी सरकारवर निशाणा साधला आहे.नाना पटोले म्हणाले की, सरकारचे आमदार असतील की मंत्री असतील त्यांना काय माज आला आहे हे आपण सगळ्यांनी पाहिला आहे. त्यांच्यातूनच एका कर्मचाऱ्याला आमदाराने मारहाण केली. या प्रकरणी सरकारने तातडीने लक्ष घातले पाहिजे. गरीब माणसांवर अत्याचार करण्यासाठी तुम्हाला लोकांनी सत्तेत पाठवले नाही. त्या डाळीमध्ये काही गडबड असेल तर तुम्हाला कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार आहे.नाना पटोले म्हणाले की, सत्तेचा माज या लोकांना आला आहे म्हणून ही लोकं सामान्य माणसांना मारत आहे. आपल्याकडे सत्ता असताना अशी मारहाण करण्याची गरज काय आहे. गरीब माणसांना मारण्याचा अधिकार यांना कुणी दिला असा सवाल पटोले यांनी केला आहे.मुंबईच्या प्रवेशद्वारावरील पाच टोल नाक्यांवर हलक्या वाहनांना व शासकीय बससेवांना टोलमाफी दिल्यामुळे खासगी कंत्राटदाराला नियमबाह्यपणे मुदतवाढ देण्यात आली. यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला (चडठऊ) अंदाजे ३००० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच चडठऊ च्या व्यवस्थापकीय संचालकांविरोधात विधानसभेत विशेषाधिकार भंगाची सूचना दाखल केली आहे. नाना पटोले म्हणाले की, मंत्रिमंडळाच्या निर्णयात ९१०.९२ कोटी रुपयांची नुकसानभरपाई नमूद करण्यात आली असली तरी संबंधित कंत्राटदाराने आपल्या पत्रात कुठलीही आकडेवारी दिलेली नाही. त्यामुळे मंत्रिमंडळाची दिशाभूल करण्यात आली असून खासगी कंपनीला बेकायदेशीर लाभ मिळवून देण्यात आला.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077